सत्यमेव जयते
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
मुख्य कार्यालय :- नवीन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई -४०० ०७१
दुरध्वनी :- ०२२ - २५२२०००२ फॅक्स नं :- ०२२ - २५२७४०७२
E-mail : lasdcmumbai@gmail.com / lasdc@rediffmail.com

जा.क्र.एसएलएएसव्हीएम/मव्य/NSFDC LOI/एचओ-3372 /2023-24 दि.14/12/2023
26

प्रति
मा. सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई -32.

विषय:-एनएसएफडीसी, दिल्ली मार्फत महामंडळास मंजूर करण्यात आलेल्या निधीबाबत..

संदर्भः-
1) या कार्यालयाचे पत्र क्र.एसएलएएसव्हीएम/प्रकल्प/शा.हमी/2741/2023-24 दि. 12/09/2023
2) या कार्यालयाचे पत्र क्र.एसएलएएसव्हीएम/प्रकल्प/शा.हमी/3275/2023-24 दि. 05/12/2023
3) या कार्यालयाचे पत्र क्र. SLASDC/Proj/NSFDC/3266/2023-24/ दि. 05-12-2023
4) एनएसएफडीसी,दिल्ली यांचे पत्र क्र. NSFDC/PROJ/MAH/SLASDC/23-24 e80708 (1to3)/3396/Dt.12 Dec. 2023
5) शासन निर्णय क्र. शाहमी-2019/प्र.क्र.05/अर्थबळ/दि. 25/02/2019
6) शुध्दीपत्रक शासन निर्णय क्र. शाहमी-2019/प्र.क्र.05/अर्थबळ/ दि. 25/02/2019

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई हे शासनाचा अंगिकृत उपक्रम असून महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील कुटुंबाना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होवून त्यांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास होणेकरिता शासन तसेच राष्ट्रीय महामंडळाकडून मिळणा-या निधीअंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात.



Scanned with OKEN Scanner

सन 1993-94 पासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळे हे राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळाची (NSFDC) अधिकृत वाहीनी (Channelizing Agency) म्हणून कार्यरत आहे. एनएसएफडीसी, दिल्ली यांचेकडून मिळणा-या निधीअंतर्गत मुदत कर्ज योजना, लघुउदयोग योजना, महिला समृध्दी योजना, लघुऋण वित्त योजना व शैक्षणिक कर्ज कर्ज योजना इ. योजना राबविण्यात येतात. सन 2012-15 या कालावधीत झालेल्या अनियमित वितरणाअभावी तसेच एनएसएफडीसी यांची देय असलेल्या प्रलंबित वसुली अभावी एनएसएफडीसीच्या योजना कार्यान्वित नव्हत्या. तथापि, महामंडळाने एनएसएफडीसी दिल्ली यांची थकित वसुली रक्कम भरणा केल्यामुळे त्यांची देय रक्कम "निरंक " आहे.

सन 2015-16 पासून एनएसएफडीसी दिल्ली यांच्या कार्यान्वित नसल्याने मातंग समाज व त्यातील 12 पोटजातीतील कुटुंबांना वंचित राहावे लागत होते. सदर योजना सुरू कराव्यात याबाबत सामाजिक संघटना, कार्यक्रते, यांचेमार्फत शासनास तसेच महामंडळास वारंवार निवेदने सादर करून मागणी करण्यात येत होती.

त्यास अनुसरून मा. सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्यं विभाग) यांनी एनएसएफडीसी योजना पुन्हा कार्यान्वित करण्याबाबतचे मौखिक निर्देश दिल्यानुसार महामंडळामार्फत संदर्भ क्र. 01 व 02 अन्वये एनएसएफडीसी, दिल्ली यांच्या योजना कार्यान्वित करणेकरिता आवश्यक असलेली शासन हमी 100 कोटी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

तसेच संदर्भ क्र. 03 च्या पत्रान्वये महामंडळामार्फत एनएसएफडीसी, दिल्ली यांचेकडे विविध योजनेअंतर्गत रू. 103.00 कोटीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास अनुसरून एनएसएफडीसी दिल्ली यांनी संदर्भ पत्र 04 अन्वये महामंडळास रू. 103.00 कोटीचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत.

एनएसएफडीसीच्या मार्गदर्शक तत्वानुसार एनएसएफडीसीच्या योजना कार्यान्वित करण्याकरिता शासन हमीची आवश्यक असते. तथापि, शासन निर्णय क्र. शाहमी-2019 /प्र.क्र.05 /अर्थबळ/ दि. 25/02/2019 तसेच शुध्दीपत्रक क्र. शाहमी-2019 / प्र.क्र.05 / अर्थबळ / दि.10/06/2019 अन्वये शासनमार्फत महामंडळास 70 कोटीची शासन हमी मंजूर असून शासन हमीची अंतिम मुदत 31-12-2024 पर्यंत आहे. सदर हमी वापरात न आल्यामुळे एनएसएफडीसी, दिल्ली यांनी उक्त शासन हमी नुसार महामंडळास रू. 103.00 कोटीचे प्रस्ताव मंजूर केले आहेत.



Scanned with OKEN Scanner

रू. 103.00 कोटीच्या मंजूर प्रस्तावांमध्ये एनएसएफडीच्या रू. 81.25 कोटी रक्कमेचा सहभाग आहे. त्यानुसार महामंडळास (रू. 81.25 कोटी - 70.00 कोटी) रू. 11.25 कोटी शासन हमीची आवश्यकता भासेल.

वरीलप्रमाणे संदर्भ 01 ते 05 च्या अधिन राहून एनएसएफडीसी यांचे मार्गदर्शक तत्वे व शासन निर्णयाचे अधिन राहून एनएसएफडीसी योजनेअंतर्गत महामंडळास मंजूर करण्यात आलेल्या योजंना कार्यान्वित करण्यात येत आहेत. माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू

(मनिष सांगळे)
व्यवस्थापकीय संचालक



Scanned with OKEN Scanner